# राज्याचा संक्षिप्त आढावा

देशाचा पश्चिम व मध्य भाग व्यापलेल्या महाराष्ट्र राज्यास अरबी समुद्राचा ७२० कि.मी. लांबीचा विस्तीर्ण सागरी किनारा लाभला आहे. पश्चिमेकडील सह्याद्री पर्वताच्या रांगा राज्याचा प्राकृतिक कणा असून उत्तरेस असलेल्या सातपुडा पर्वताच्या रांगा व पूर्वेस असलेल्या भामरागड - चिरोली - गायखुरी या डोंगर रांगा राज्याच्या नैसर्गिक सीमा आहेत.

भौगोलिक क्षेत्र (३.०८ लक्ष चौ.कि.मी.) व लोकसंख्या या दोन्ही बाबतीत महाराष्ट्र हे देशात दुसऱ्या क्रमांकाचे राज्य आहे. राज्याची लोकसंख्या सुमारे ११ कोटी (जनगणना २०११) असून ती देशाच्या एकूण लोकसंख्येच्या ९.३ टक्के आहे. राज्याचे मोठ्या प्रमाणावर नागरीकरण झाले असून ४५ टक्के लोकसंख्या नागरी भागात राहते.

राज्यात ३५ जिल्हे असून प्रशासकीय प्रयोजनासाठी ते कोकण, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर या सहा महसुली विभागात विभागले आहेत. जिल्हा स्तरावरील नियोजनासाठी राज्यात पूर्वापार काळापासून प्रभावी यंत्रणा कार्यरत आहेत. स्थानिक प्रशासनासाठी राज्याच्या ग्रामीण भागात ३३ जिल्हा परिषदा, ३५१ पंचायत समित्या व २७,९०६ ग्रामपंचायती आहेत, तर नागरी भागात २३ महानगरपालिका, २२१ नगरपरिषदा, ५ नगरपंचायती व ७ कटक मंडळे आहेत.

महाराष्ट्राची राजधानी असलेली मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी असून जवळजवळ सर्वच प्रमुख निगम व वित्तीय संस्था यांची मुख्यालये या शहरात आहेत. देशातील प्रमुख वायदे व भांडवली बाजार आणि विक्रेय वस्तू व्यापार केंद्रे मुंबईत आहेत.

चालू किंमतींनुसार २०१०-११ या वर्षाचे स्थूल राज्य उत्पन्न ₹ १०,६८,३२७ कोटी असून देशांतर्गत स्थूल उत्पन्नात राज्याचा सुमारे १४.९ टक्के हिस्सा आहे. गेल्या काही वर्षांपासून स्थूल राज्य उत्पन्न वेगाने वाढत आहे. राज्यातील औद्योगिक व सेवा या दोन्ही क्षेत्रांचा स्थूल राज्य उत्पन्नात एकत्रित हिस्सा सुमारे ८७ टक्के आहे. कृषि व संलग्न कार्ये या क्षेत्राचा राज्य उत्पन्नातील हिस्सा १३ टक्के आहे.

राज्यातील २२६.१ लाख हेक्टर जमीन लागवडीखाली आहे व ५२.१ लाख हेक्टर जमीन वनांखाली आहे. सिंचनात वाढ व्हावी यासाठी अनेक सिंचन प्रकल्प राबविण्यात येत आहेत. बिगर सिंचन क्षेत्रात पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम गतीने राबविण्यासाठी जलसंधारण अभियानाची स्थापना करण्यात आली आहे.

पशुसंवर्धन हे कृषि क्षेत्राशी संबंधीत महत्वाचे क्षेत्र आहे. देशातील पशुधन आणि कुक्कुटपालन यामध्ये राज्याचा हिस्सा अनुक्रमे ६.८ व १० टक्के आहे आणि पशुधन आणि कुक्कुटपालनामध्ये राज्य हे देशात सहाव्या क्रमांकाचे राज्य आहे.

महाराष्ट्र सर्वात जास्त औद्योगिकीकरण झालेले राज्य आहे. लघु उद्योगात हे राज्य अग्रेसर आहे. देशांतर्गत तसेच विदेशी संस्थांकडून औद्योगिक क्षेत्रात गुंतवणूक आकर्षित करण्यात राज्याने सातत्य राखले आहे. हे राज्य मोटार वाहने उत्पादनाचे तसेच माहिती तंत्रज्ञानाचे प्रमुख केंद्र बनले आहे. मोठ्या प्रमाणावर स्थापित होणारे विशेष निर्यातवृद्धी झोन हे राज्यासाठी अभिमानास्पद आहेत.

राज्याने प्राथमिक शिक्षणास महत्व दिल्यामुळे साक्षरता दरात सातत्याने सुधारणा होत आहे. जनगणना २०११ नुसार देशाचा साक्षरता दर ७४ टक्के होता, तर राज्याचा साक्षरता दर ८२.९ टक्के होता. राज्यात अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि व्यवस्थापन क्षेत्रातील उच्च शिक्षणाच्या उत्कृष्ट संस्था आहेत.

मानव विकास निर्देशांकाची प्रगती ही अनेक वेळा राज्याच्या मुख्य विकास निर्देशकाची प्रगती दर्शविते. भारताचा मानव विकास अहवाल २०११ नुसार देशाचा मानव विकास निर्देशांक ०.४६७ आहे व राज्याचा मानव विकास निर्देशांक ०.५७२ असून राज्याचा देशात पाचवा क्रमांक आहे.

राज्यात २.४१ लाख किलोमीटर लांबी असलेले (सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषदेच्या देखभालीखालील) व सर्वदूर पसरलेले रस्त्यांचे जाळे आहे. राज्यातील सुमारे ९७.८ टक्के गावे बारमाही रस्त्यांनी जोडलेली आहेत. राज्यातील भूपृष्ठीय वाहतूक सुविधा उत्कृष्ट असून बंदरे व विमानतळांशी असणाऱ्या संपर्क व्यवस्थेमुळे राज्यात वाहतूक व्यवस्थेची चांगली सुविधा उपलब्ध झाली आहे. विजेची स्थापित क्षमता आणि निर्मितीच्या बाबतीत देशात हे राज्य अग्रस्थानी आहे. या सर्व बाबींमुळे गुंतवणुकीसाठी हे जास्त पसंतीचे राज्य बनले आहे.

हे राज्य प्रशासकीय क्षमता आणि नवनवीन कल्पनांबाबत सुपरिचित आहे. महिला धोरण राबविणारे तसेच महिलांच्या विकासासाठी 'महिला व बाल विकास' या स्वतंत्र विभागाची स्थापना करुन अर्थसंकल्पीय तरतूद करणारे हे पहिले राज्य आहे. 'रोजगार हमी योजना' राबविणारे हे आद्यप्रवर्तक राज्य असून केंद्र शासनाने ही योजना अंगिकारली आहे.

महाराष्ट्र राज्य हे केवळ भौगोलिक सीमांनी अधोरेखित केलेले राज्य नसून येथील जनतेने संघटितरित्या परिश्रमपूर्वक घडविलेले राज्य आहे. या राज्याची एकमेव मराठी संस्कृती विकसित होण्यास नैसर्गिक तसेच सांस्कृतिक विविधता सहाय्यभूत झाली आहे. या राज्यास स्वत:ची अध्यात्मिक बैठक असून हे राज्य 'संतांची भूमी' म्हणून ओळखले जाते. तत्कालीन संतांनी अध्यात्मिक सहभागाने राज्याच्या विविध भागात सांस्कृतिक पुनरूत्थानास हातभार लावला. अजंठा, वेरूळ व घारापुरीची लेणी, गेट वे ऑफ इंडिया आणि वास्तुशास्त्राच्या वैशिष्ट्यपूर्ण वास्तु जसे विहार व चैत्य यामुळे जगभरातील पर्यटक राज्याकडे आकर्षित होतात. अविस्मरणीय स्मारकांबरोबरच विविध समुहातील लोकांची एकजूट व त्यांचा सांस्कृतिक वारसा यामुळे देशात राज्याने मानाचे स्थान प्राप्त केले आहे. मानव विकासास सहाय्यभूत ठरणाऱ्या प्रत्येक क्षेत्रात कार्य करणारी व्यक्तिमत्वे राज्यात उदयास आली आहेत. क्रीडा, कला, साहित्य व सामाजिक सेवा यामध्ये राज्याचे भरीव योगदान आहे. 'बॉलीवूड' नावाने जगप्रसिध्द असलेला चित्रपट उद्योग राज्यात आहे.

महाराष्ट्र हे या सर्व वैशिष्ट्यांमुळे सर्वोत्तम राज्य बनले आहे.

* * * * *